स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

समाजिक शाखे अंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)पदवीसाठी

सादर करावयाचा संशोधन आराखडा

प्रस्तावित

संशोधन आराखडा

(RESEARCH OUTLINE)

विषय

‘‘सन १९५६ नंतर च्या धर्मांतरानंतर नांदेड जिल्हयातील उपेक्षित समाजाची वाटचाल - १९५६ ते २०१६’’

संशोधक

लक्ष्मण गंगाधर शेळके

(एम.ए.,एम.एड.)

मु. राजापूर, ता. धर्माबाद, जि. नांदेड.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. एन.जी. भद्रे

(एम.ए.पीएच.डी.)

सहाय्यक प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक
पदव्युत्तर इतिहास विभाग,
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर, ता. बिलोली, जि.नांदेड.

१) विषय:-(Topic)

''सन १९५६ नंतर च्या धर्मांतरानंतर नांदेड जिल्हयातील उपेक्षित समाजाची वाटचाल - १९५६ ते २०१६''

२) प्रस्तावना:-(Introduction)

भारताचीजगाला उत्तम रितीने ओळख करून देणाऱ्या ज्या व्यक्ती आहेत त्यामध्ये तथागत गौतम बुध्द हे प्रथमस्थानी आहे. ''जगातील शेवटच्या माणसाच्या डोळयातील शेवटचा अश्रु पुसला जाईपर्यंत मला मोक्ष नको'' असे संकल्प घेऊनभारतीय चिंतनाला त्यांनी अत्युच्च शिखरावर नेऊन पोहचविले होते. त्यांचा उपदेश आचरणात आणने हे भूतकाळाइतकेच आजही प्रकाशाचा मार्ग दाखवणारे आहे, म्हणूनच बुध्द हे भूतकाळाबरोबरच वर्तमानाचे आणि भविष्याचेही प्रेरणास्त्रोत आहेत.

भारतीय समाजात प्रांत-भेद, जाती-भेद, धर्म-भेद, पंथ-भेद, भाषा-भेद असूनवैदिक काळातील समाज हा तर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशा चार्तुवर्ण्य व्यवस्थेत विभागला होता. वेद या ग्रंथाच्या लिखाणाने ब्राह्मणाने स्वत:ला देवपण, देवाच्या रूपातील जीवंत व्यक्ती बनवून घेतले होते. भूतकाळाच्या उदरातुन उद्‌भवलेल्या शेकडो वर्षापासून वर्णव्यवस्थेवर आधारित समाजाद्वारे शुद्राना पशुवत वागणूक दिल्या जात होती. आधुनिक समाजव्यवस्थेतील विविध प्रकारच्या ताणतणवानी ग्रस्त झालेले नाना प्रकारच्या समस्यानी गोंधळून गेलेले आणि मन:शांतीचा व स्वास्थाचा ध्यास घेतलेले जगभराचे लोक तथागताच्या तत्वज्ञानाकडे जगण्याचा उज्ज्वल प्रकाश म्हणून पहात आहेत. आधुनिक काळात 'जुने ते सोने' मानण्याच्या चार्तुवर्ण्यव्यवस्थेवर महात्मा फुले, शाहू महाराज आणि बाबासाहेब आंबेडकरांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि परिवर्तनासाठी लोकमानस तयार केले.

भारतीय समाजाचे पुनर्निर्माण हे बुध्द धर्माच्या पुर्नज्जीवनाशिवाय शक्य नाही म्हणूनच बाबासाहेबांनी ''मी अस्पृश्य हिंदु म्हणून जन्माला आलो पण हिंदु म्हणून मरणार नाही'' अशी जाहिरपणे घोषणा केली. हिंदु धर्म त्यागाच्या घोषणेनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पर्यायी धर्माचा अभ्यास सुरू केला, कारण घोषणेच्या वेळी हिंदू धर्माचा त्याग करणे हे जसे स्पष्ट होते, तसे यानंतर कोणता धर्म स्वीकारायचा हे ठरलेले

नव्हते. भारतातच विद्यमान असलेल्या प्रमुख धर्मातून एखाद्या धर्माची निवड करून त्या धर्माचा स्वीकार करणे त्यांना आवश्यक होते. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विद्यमान धर्माचा गंभिरपणे अभ्यास करून त्याची चिकित्सा करायला सुरूवात केली, परिणामत: अज्ञान, अंधश्रध्दा, कर्मकांड, जातीयता, विषमतेत ग्रासलेल्या माणसाला माणूसपण नाकारणारा हिंदू धर्म त्यागुन समता, स्वतंत्र, बंधूता व न्याय याचा पुरस्कार करणारा तथागत बुध्दाचा धम्म स्वीकारून आपल्या लाखो अनुयायांनाही बौध्द धर्माची दिक्षा देवून रक्तहिन क्रांति करणे गरजेचे वाटले, म्हणूनच बाबासाहेबांनी १९३५ साली येवले मुक्कामी धर्मांतराची घोषणा केली व १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर मुक्कामी आपल्या पाच लाख अनुयायांसमवेत ती पूर्ण केली आणि धम्म क्रांतीच्या चक्राला गती देण्याचे महान क्रांतीकारी कार्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतरानंतर नव-दिक्षित बौध्दाच्या मनात मोठा वैचारिक बदल घडून आला. बौध्द धर्माचा स्वीकार केल्यामुळे नवबौध्दाच्या मनात, मी आता बौध्द आहे, अस्पृश्य नाही, मी आता वरिष्ठ हिंदूच्या बरोबरीचा माणूस झालो आहे, मी आता स्वतंत्र भारतीय नागरिक झालो, अशा प्रकारचा सकारात्मक बदल दिसून येतो. परिणामत: संपूर्ण महाराष्ट्रभर सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि सांस्कृतिक चळवळी सुरू झाल्या. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा मुलमंत्र दिला. डॉ बाबासाहेबांनी नवदिक्षित बौध्दात धार्मिक शक्ती निर्माण करण्यासाठी 'भारतीय बौध्द महासभे'ची व राजकीय संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'भारतीय रिपब्लीकन पार्टी'ची संकल्पना मांडली. त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर राजकिय पक्षाचेसंगठन कौशल्याच्या अभावामुळे पक्ष दिशाहीन झाला. त्यातूनच पक्षाचे विभाजन होवून वेगवेगळे गट तयार झाले. दलित नेते मंडळींनी वैयक्तिक स्वार्थापोटीसंगठण दावणीला बांधले त्यामूळे बौध्द धर्माच्या विकासाची अवस्था पुन्हा एखदा विस्कळित झाली.या राजकिय विभाजनाचा प्रत्यक्षपणे समाजावर प्रभाव पडला. याचा परिणाम असा झाला कि, सामान्य लोक बौध्दीक दृष्टीने विकसित झालेले असले तरी मानसिक व आत्मिक दृष्टयाआज देखिल कळत नकळत ब्राह्मणी व्यवस्थेच्या आचरणास बळी पडत आहेत, म्हणून ऐतिहासिक दृष्टीकोणातून या उपेक्षित

समाजाच्या इतिहासाचाआढावा वर्तमान संदर्भात घेणे महत्वाचे व आवश्यक ठरेल असे मला वाटते.

‘‘मी सारा भारत बौध्दमय करेन’’ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी यशवंत ऊर्फ भैय्यासाहेब आंबेडकर व त्याच्या इतर सहकाऱ्यांनी कश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत धर्मांतराची चळवळ चालवलेली होती. विशेषत: धर्मांतराच्या चळवळी डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वानानंतर अनेक ठिकाणी घडवून आणल्या गेल्या. मराठवाडयामध्ये नांदेड, हिंगोली, औरंगाबाद, पुर्णा, वैजापूर, चिखली, किनवट व दाभड आदी ठिकाणी बहुसंख्य लोकांनी यशवंतराव आंबेडकर व त्यांच्या इतर सहकाऱ्यासमवेत बौध्द धर्माची दिक्षा घेतली. बौध्द धर्म स्वीकारल्यामुळे जातीय समाजरचना नष्ट होऊन लोकशाही प्रधान समाज निर्माण होण्यास मदत झाली आणि समाजिक,आर्थिक, शैक्षणिक, वैचारिक व राजकीय प्रगतीकडे वाटचाल सुरू झाली. या वाटवचालीचे नांदेड परिसरातील उपेक्षित समाजातील धर्मदिक्षीत बौध्दावरही प्रभाव पडणे स्वभाविक होते. हा धर्मदिक्षीत बौध्दामध्ये झालेले परिवर्तन धर्मचक्र परिवर्तनाचा परिणाम असून आपल्याच मायभूमीत म्हणजेच भारतभूमित बौध्द धर्माचे पुर्नज्जीवन करण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीकेले असे मला ठामपणे वाटते.

भारतीय समाजाचे पुर्ननिर्माण हे बुध्द धर्माच्या पुर्नरूज्जीवन शिवाय शक्य नाही. युग कोणतेही असले, तरी ते विचारांच्या प्रभावातूनच साकार होत असते, मग ते वेदकालिन विद्‌वानांच्या संकल्पनेतील असो किंवा वर्तमान काळातील प्रभावी व्यक्तिच्या वैचारिक सामर्थ्याने निर्माण झालेले असू शकते. त्यामूळे वर्तमानात ज्या परंपरा विद्यमान आहेत त्याचे दुर्गामी परिणाम काय होणार आहेत, याचा विचार करून आपल्याला परंपरा बदलासाठी वातावरण तयार करावे लागेल, कारण वर्तमान राजकीय परिस्थिती लक्षात घेता राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक समस्या दोन हात करत आहेत. उदा. दहशतवाद, नक्षलवाद, आतंकवाद, घुसखोरी या समस्या सोडविण्यासाठी युध्दाची नव्हे तर गौतम बुध्दाच्या तत्वज्ञानाची अधिक आवश्यकता

आहे. भारतीय संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या विवेकी आणि व्यासंगी महामानवाने भारतीय समाजालापुन्हा एकदा तथागत गौतम बुध्दाच्या उपदेशाकडे, धम्माकडे वळवले याचे कारण ही त्यांच्या चिंतनाची सद्य:स्थितीमध्ये जाणवणारी आवश्यकता होय.

३) विषय निवड:-(Selection of the subject)

भगवान गौतम बुध्दानी मानवता हाच खरा धर्म आहे, व समता, स्वतंत्र, बंधुता व न्याय असा उपदेश दिला आहे. वैदिक काळापासूनउपेक्षित अथवा अन्य शोषित वर्णीयांच्या वेदनेला प्रामुख्याने चातुवर्णी व्यवस्थाच जबाबदार असल्याने त्याविरोधात क्रांतीकारी बदल होणे गरजेचे आहे, असा बुध्द धम्म विचार बाबासाहेबानी दिला आणि आपल्या पाच लाख अनुयायासमवेत बौध्द धर्माची दिक्षा नागपूर मुक्कामी घेतली. यामुळे बौध्द धर्माचे पुर्नज्जीवन झाले व उपेक्षितांच्या सर्वांगीण जीवनामध्ये अमुलाग्र बदल घडून आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धम्मदिक्षेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रभर उमटणे स्वभाविक होते म्हणूनच आज धम्मचक्र परिर्वनानंतरचे परिवर्तन या विषयावर शोधनिबंध प्रकाशित होत आहेत. विशेषत: नांदेड परिसरातून अशा प्रकारचे प्रयत्न झालेले आढळत नाहीत म्हणून उपरोक्त विषय अभ्यासाकरीता अतिशय महत्वाचा आहे.

४) संशोधनाचे प्रमुख उद्‌देश :-(Objective of the Study)

१. प्राचीन बौध्द धर्म आणि आधुनिक बौध्द धर्म यातील वेगळेपणाचा शोध घेणे.
२. गौतम बुध्दाच्या तत्वज्ञानाचा आजच्या नवदिक्षित बौध्दावरील प्रभावाचा अभ्यास करणे.
३. बाबासाहेब आंबेडकरांच्या धार्मिक विषयाच्या चिंतनाचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे.
४. नवदिक्षीत बौध्दानी प्राचीन धार्मिक परंपराचा त्याग केला का? याचा शोध घेणे.
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धर्मच का स्वीकारला? या कारणाचा शोध घेणे.

६. नांदेड परिसरातील बौध्दाचे झालेले परिवर्तन हे धर्मक्रांतीचा परिणाम आहे का? याचा शोध घेणे.

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित बौध्द धर्माचे वेगळेपण तपासणे.

८. अलिकडच्या काळातील राजकीय विभाजनामुळे वर्तमान समाजवरील प्रभावाचा ऐतिहासिक दृष्टीकोणातून बारकाईने अभ्यास करणे.

९. नवदिक्षित बौध्दाच्या मानसिक बदलाचा बारकाईने अभ्यास करणे.

१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याधर्मांतराचे उद्देश किती प्रमाणात साध्य झाले याचा शोध घेणे.

११. नांदेड परिसरातील बौध्द धर्मियांच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.

५) गृहितके (Hypothesis)

१. हिंदू धर्मात जन्म घेणेच आमच्या प्रगतीच्या आड येते म्हणूनच बाबासाहेबांनी स्वतंत्र,समता, बंधुता व न्याय अशा लोकशाही मूल्याचा बौध्द धर्म निवडला.

२. डॉ. बाबासाहेबांनी वर्णव्यवस्थेवर आधारित समाजात जगत असलेल्या उपेक्षित समाजात जागृती घडवून त्यांच्या मौलिकअधिकारासाठी परिवर्तनवादी विचारांचा मार्ग निवडला.

३. भारतीय समाजाची पुर्नरचना करू शकेल असे तत्वज्ञान बौध्द धर्मात असल्यामुळे त्यांनी धर्मांतरण घडवून आणले.

४. आधुनिक भारतीय इतिहासातील सर्वात मोठी रक्तपातरहित सामाजीक क्रांती आंबेडकरांच्या धर्मदिक्षेमुळे घडून आली.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक मुल्यानुरुप नव्या बौध्द धर्माची पुर्णमांडणी केली.

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या नव्या धर्मामुळे पूर्वउपेक्षितांच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व वैचारिक जीवनात अमुलाग्र परिवर्तन घडून आले.

६) संशोधनाची आवश्यकता (Important of Reserch)

भगवान गौतम बुध्दानी 'मानवता हाच खरा धर्म आहे' व समता, स्वतंत्र, बंधुता व न्याय असा उपदेश दिला आहे. त्यांनी भारतीय चिंतनाला अत्युच्च शिखरावर नेऊन पोहचविले होते. बुध्दाचा उपदेश आचरणात आणने हे भूतकाळाइतकेच आजही प्रकाशाचा मार्ग दाखवणारे आहे. वैदिक काळातील वर्णव्यवस्थाच प्रामुख्याने उपेक्षित अथवा अन्य शोषितांच्या वेदणेला कारणीभूत असल्याने त्याविरोधात क्रांतिकारी बदल होने गरजेचे आहे, असा बुध्द धम्म विचार बाबासाहेबांनी देवून आपल्या पाच लाख अनुयायासमवेत बौध्द धर्माची दिक्षा नागपूर मुक्कमी घेतली यामुळे बौध्द धर्माचे पुर्नज्जीवन झाले व उपेक्षितांच्या सर्वांगीण जीवनामध्ये अमुलाग्र बदल घडून आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धम्मदिक्षिचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रभर उमटणे स्वभाविक होते म्हणूनच आज धर्मचक्र परिवर्तनानंतरचे परिवर्तन या विषयावर शोधनिबंध प्रकाशित होत आहेत. विशेषत: नांदेड परिसरातून अशा प्रकारचे प्रयत्नझालेले आढळत नाहीत म्हणून उपरोक्त विषय अभ्यासाकरिता अतिशय महत्वाचा आहे.

७) संशोधन पध्दती (Methodology)

प्रस्तूत संशोधन कार्यासाठी जो अभ्यास करावयाचा आहे त्या धर्मदिक्षित बौध्दाची नांदेड जिल्ह्यातील लोकसंख्या साडेतिन लाखापेक्षा अधिक असल्यामुळे प्रश्नावली व मुलाखती घेण्यासाठी समग्र धर्मांतरीत बौध्दामधून तिनशे व्यक्तिचीच निवड करून नमुना पध्दतीने अभ्यास केला जाईल. नमुना निवड पध्दती आणि संशोधनात वस्तुनिष्ठता येण्यासाठी 'कोटा पध्दत' वापरून नांदेड परिसरातील शहरी, ग्रामीण, उच्चपदस्थ, नोकरपेशा, व्यावसायिक, शेतकरी अशा सर्व स्तरावरील नवदिक्षितांना नमुना निवडित स्थान दिले जाईल.

प्रस्तावित अध्ययनासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही तथ्य संकलनाच्या पध्दतीचा उपयोग केला जाईल.

★प्राथमिक पध्दत:-

प्रस्तुत अध्ययनासाठी महत्वपूर्ण बाबतीत तथ्य संकलनासाठी प्राथमिक पध्दत वापरली जाईल. या पध्दतीनूसार तथ्य संकलनासाठी अवलोकन पध्दत, मुलाखत पध्दत व प्रश्नावली पध्दत वापरली जाईल व त्यासाठी अनुसूची तंत्र उपयोगात आणले जाईल.

★दुय्यम पध्दत:-

कुठल्याही ऐतिहासिक संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही प्रकारच्यासाधनाचा वापर करून तथ्य संकलित करणे आवश्यक असते. त्यामुळे प्रस्तुत संशोधनसाठी ग्रंथालय पध्दतीचा वापर केला जाईल आवश्यकता वाटल्यास महत्वपूर्ण दस्ताऐवज व मुळ कागदपत्रांचे अंतर्गत व बाह्य परिक्षण केले जाईल.

८) संशोधनाचे महत्व :-(Significance of the study)

प्राचीन काळापासून ते उत्तर आधुनिक काळापर्यतचा भारताचा इतिहास पाहिला तर भारतीय समाज जीवनावर जातीव्यवस्थेचा पगडा अधिक राहिलेला आपणास दिसून येतो. यामुळे साहजिकच स्वातंायोत्तर काळात भारतीय जातीव्यवस्था व तिचे विविध पैलू हा सामाजिक शास्त्राच्या अभ्यासाचा महत्वाचा विषय बनला. विशेषत: समाजशास्त्रामध्ये या अनुषंगाने विस्तृत अभ्यास झाला व तो अजूनही चालूच आहे. त्या तुलनेत इतिहासामध्ये हा विषय कमी प्रमाणात अभ्यासला गेला. मराठे, पेशवे, स्वातंत्रलढा व त्याचे विविध पैलू या विषयाभोवतीच महाराष्ट्रातील इतिहास संशोधन फिरत राहिल्यामुळे ‘सबाल्टर्न’ सारख्या नवनव्या दृष्टीकोनातून त्यातही समकालिन समाजिक इतिहासावर फारसे काम झाले नाही असे मला वाटते. म्हणूनच मी निवडलेला प्रस्तावित विषय हा समकालिन व सामाजिक इतिहासाशी संबंधित असणे हेच त्याचे वेगळेपण आहे. नांदेड परिसरातील धर्मांतरित बौध्द समाज हा विषय घेऊन त्याच्या प्रगतीचे विश्लेषण करणे हा पहिलाच प्रयत्न असल्यामुळे हा विषय महत्वाचा ठरेल.

९) संशोधनाचे अभ्यास मर्यादा:-(Limitation of the Study)

प्रस्तावित संशोधन कार्यासाठी अध्ययनाचे क्षेत्र नांदेड परिसर राहिल. डॉ. बाबासाहेबांनी नागपूर मुक्कामी धम्मदिक्षा पुर्वाश्रमीच्या उपेक्षितांना दिली व लगेचच ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे महापरिनिर्वाण झाले. त्यांच्या धर्मांतराचा प्रभाव मराठवाडयावर देखिल दिसून येतो म्हणून धर्मांतराच्या १९५६ ते २०१६ या ६० वर्षातनांदेड परिसरातील नवदिक्षित बौध्दाची स्थिती नेमकी कशी आहे? हे शोधणे त्या जिल्ह्यातील रहिवाशी म्हणून संशोधकाला आवश्यक वाटते.

संशोधन कार्यासाठी आवश्यक मुलाखती, प्रश्नावली भरुन घेणे व वेगवेगळे आकडेवारी मिळविणे इत्यादीबाबत नांदेड परिसर प्रमुख संशोधन क्षेत्र मर्यादीत असले तरी तुलनात्मक अभ्यासाठी आवश्यक माहिती व आकडेवारी अन्य जिल्ह्यातून मिळवली जाईल. संशोधन विषय धर्मांतरीत बौध्दाच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व वैचारिक अशा सर्वच अंगाचा सखोल अभ्यास केला जाणार असल्यामुळे या संशोधनाची व्याप्ती केवळ इतिहास विषयापुरतीच मर्यादीत न राहता ती समाजविज्ञान शाखेतील सर्वच विषयांना व्यापनारी राहिल.

१०) प्रकरण योजना :-(Tentative scheme of chapterisation)

प्रकरण १ ले:-महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती व शूद्राचे स्थान:-

हिंदू धर्माची सामाजिक व्यवस्था ही वर्णव्यवस्थेवर व जातीव्यवस्थेवर आधारित आहे. जन्म हा वर्ण व जाती व्यवस्थेचा आधार होता. हिंदू धर्माव्यतिरिक्तइतर कोणत्याही धर्मात अशी व्यवस्था आढळून येत नाही. या करीता शुद्राची समाजातील स्थिती कशी होती? याचा प्राचीन काळापासून ते आुधनिक काळापर्यंतचा संक्षिप्त अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येईल.

प्रकरण २ रे:-डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विविध धर्माचे अध्ययन आणि धर्मांतर:-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खरोखरचएक बुध्दिनिष्ठ व सुधारवादी विचारवंत होते. त्यांनी हिंदू धर्मत्यागाच्या घोषणेनंतर पर्यायी धर्माचा शोध घेत असतांना त्या काळात भारतात विद्यमान असणाऱ्या इस्लाम, ख्रिश्चन, शीख, बौध्द या सर्व धर्माचा अभ्यास सुरू केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विद्यमान धर्माचा गंभीरपणे अभ्यास करून बौध्द धर्मच कास्वीकरला? या दृष्टीकोणातून अध्ययन या प्रकरणामध्ये करण्यात येईल.

प्रकरण ३ रे:-नांदेड परिसरातील वर्तमान संघटनाचे कार्य व नेत्याची भूमिका:-

डॉ. बाबासाहेबांनी 'शिका, संघठित व्हा आणि संघर्ष करा' असा मूलमंत्र दिला. त्यांनी नवदिक्षित बौध्दात धार्मिक शक्ती निर्माण करण्यासाठी 'भारतीय बौध्द महासभे'ची स्थापना केली व राजकीय संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'भारतीय रिपब्लिकन पार्टी'ची संकल्पना मांडली. परंतु त्याच्या महापरिनिर्वानानंतर राजकीय पक्षाचे नेतृत्व संगठन कौशल्याच्या अभावामूळे पक्ष दिशाहिन झाला. त्यातूनच पक्षाचे विभाजण होवून वेगवेगळे गट तयार झाले. दलित नेते मंडळीनी वैयक्तिक स्वार्थापोटी संगठन दावणीला बांधले त्यामुळे बौध्द धर्माच्या विकासाची अवस्था पुन्हा एखादा विस्कळित झाली. या परिस्थीतीचा नवबौध्द लोकांवर काय प्रभाव पडला? याचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून वर्तमान संदर्भात आढावा या पाठात घेण्यात येईल.

प्रकरण ४ थे:-धर्मांतरानंतर नांदेड परिसरातील सामाजिक धार्मिक आणि सांस्कृतिक परिवर्तन:-

महाराष्ट्रातील समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी हिंदू धर्माचा त्याग करूण स्वातंत्र, समता, बंधूता व न्याय यावर आधारित बौध्द धर्माचा स्वीकार करणे हे एक मोठी क्रांती होती. अस्पृश्य समाजाच्या दृष्टीने विचार केल्यास ती एक वैचारिक क्रांती होती. धर्मांतरित बौध्दाचा प्राचीन काळातील कर्मकांडावरील विश्वास उडाला, देव-देवताकडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलला, स्तूप, चैत्य,महाविहार, बौध्द लेण्या, स्थापत्यकला इ. महाराष्ट्राची नवबौध्दाची सांस्कृतिक जीवनाची प्रतिके झाली. एकुणच

काय तरधर्मांतरानंतर सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येईल.

प्रकरण ५ वे:-नांदेड परिसरातील शैक्षणिक, आर्थिक विकास व वैचारीक मतपरिवर्तन:-

प्राचीन काळापासून उपेक्षित समाजाला शिक्षण नाकारले गेल्यामुळे त्याची प्रगती झाली नाही. मात्र धर्मांतराच्या नंतर शिक्षणाचे महत्व त्यांनी ओळखले. ‘शिक्षणाशिवाय तरणोपायनाही’याची त्यांना स्पष्ट जाणिव झाली. परिणामत: धर्मांतराच्या साठ वर्षांनतर बौध्द समाजाने शिक्षणामध्ये जागृती घडवून आपल्या सर्वांगीण जीवनामध्ये अमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. शिक्षणाचे महत्व कळल्यामुळे स्वत:च्या इच्छे व आवडीनूसार व्यवसाय किंवा धंदा करून आपली आर्थिक स्थिती सुधारण्याचे कार्य नवबौध्दाने केले. त्यांच्या परंपरागत व्यवसायामध्ये अमुलाग्र परिवर्तण घडून आले. सोबतच बौध्द धर्म स्विकारल्या नंतर नवबौध्दामध्ये वैचारिक व मानसिक परिवर्तन फार मोठया प्रमाणात घडून आले. यासर्वांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण ६ वे:-उपसंहार:-

या प्रकरणामध्ये संशोधन अभ्यासाचा सारांश व अभ्यासात आलेले निष्कर्ष मांडण्यात येतील. साधनाच्या उपलब्धतेनूसार यामध्ये थोडाफार फेरफार होण्याची शक्यत असली तरी मूळ संशोधनाचा गाभा मात्र हाच राहिल. मुळातच संशोधणाचा हेतू सामाजिक हित साधने हा आहे तो साध्य होतो का? याचे वस्तुनिष्ठ निष्कर्ष नोंदविले जातील.

११) मुलाखत अनुसूची:-

''सन १९५६ नंतर च्या धर्मांतरानंतर नांदेड जिल्हयातील उपेक्षित समाजाची वाटचाल - १९५६ ते २०१६''

वैयक्तिक व कौटूंबिक माहिती:-

१. संपूर्ण नांव :-------------------------

२. गाव:-------------तालुका:---------जिल्हा ----

३. लिंग : स्त्री/पुरूष, वय -------,वर्षे, वैवाहिक स्थिती: विवाहित/अविवाहित

४. शिक्षण :-----------व्यवसाय -------------

५. वार्षिक उत्पन्न -------------जातीचा प्रवर्ग : बौध्द/नवबौध्द/बुध्दीजम

६. प्रमाणपत्र क्र.------------- दिनांक -------------

७. कुटूंबाचा प्रकार : संयुक्त/विभक्त

८. कुटूंबाचा एकुणसदस्य संख्या ---- अ) महिला -------- ब) पुरूष ----

९. अपत्यांची एकुण संख्या अ) मुलगी -------- ब) मुलगा ---------

१०. आपण रहाता ते घर कुणाच्या मालकीचे आहे. स्वत:चे/वडिल/भाडयाचे आहे.

सामाजिक, आर्थिक, धार्मि व सांस्कृतिक जीवन विषयक प्रश्न.

११. आपल्या वडिलांची जात कोणती होती?

अ) महार ब) बौध्द ३) नवबौध्द ड) बुध्दीझम इ) इतर

१२. आपल्या पूर्वीच्या तुलनेत धर्मांतरीत नवबौध्द म्हणून समाजातील दर्जा कसा आहे?

अ) पूर्वीसारखाच ब) बराच उंचावलेला ३) सर्वसाधारण

१३. आपण बौध्दधर्मीय आहात म्हणून इतरांकडून आपणाला वागणूक कशी मिळते?

अ) चांगली ब) वाईट ३) साधारण ड) सर्वसाधारण

१४. आपण आपल्या घरातील स्त्रीला आदराने वागविता का? होय/नाही

१५. आपण आपल्या जातीतच विवाह करता का? होय/नाही

१६. आपला व्यवसाय कोणता आहे? -----------------------

१७. आपण बौध्द धर्मीय झाल्यामुळे आपला विकास झाला का? होय/नाही

१८. आपण आपल्या वडिलांपेक्षा प्रगती अधिक झपाटयाने केली असे वाटते का? होय/नाही

१९. आपल्या कुटूंबातील स्त्रियांना मालमत्तेमध्ये वाटा दिला जातो का? होय/नाही

२०. आपल्या कुटूंबातील स्त्रिया नोकरी करतात का? होय/नाही

२१. आपल्या घरामध्ये 'देवघर' आहे काय? होय/नाही

२२. आपण आपल्या घरातील वडिलाधाऱ्या व्यक्तींच्या मृत्यूनंतरकेस कापता का? होय/नाही

२३. अंत्यविधी प्रसंगी (स्मशाणात) स्त्रियांना प्रेतयात्रेबरोबर येण्याची परवानगी आहे का? होय/नाही

२४. आपण दसरा, दिवाळी, होळी, रक्षाबंधनहे हिंदू सण साजरे करता का? होय/नाही

२५. आपल्या गावात/वाडीत बौध्द विहार आहे का? होय/नाही

२६. आपण विहारामध्ये कधी जाता? दररोज/आठवडयातून एकदा/वर्षातून एकदा/जात नाही

२७. आपल्या घरातील धर्मिक कार्यक्रमाप्रसंगी आपण भिख्खूंना बोलविता का? होय/नाही

२८. बौध्द संस्कृती दर्शविणारे एखादे प्रतिक तुमच्या घरात आहे का? होय/नाही

१२) संदर्भग्रंथ (Select Bibliography)

<u>प्रकाशीत मूळ साधने:-</u>

- डॉ. आंबेडकर बी. आर. :- क्रांती आणि प्रतिक्रांती, अनुपम पगारे, सुगत प्रकाशन, वैशाली नगर, नागपूर १२ डिसेंबर २००८.
- डॉ. आंबेडकर बी. आर. :- शुद्र पुर्वी कोण होते? अनुवादित खैरमोडे चां.भ., सुधिर प्रकाशन बोरगाव मेघे, वर्धा, द्वितिय आवृत्ती मार्च २००३.
- डॉ. आंबेडकर भीमराव रामजी :- धर्मांतर का? डॉ. अशोक गायकवाड, कौशल्य प्रकाशन, एन-११, हडको औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २० ऑक्टो.२००७
- डॉ. आंबेडकर बी. आर. :- अस्पृश्य आणि अस्पृश्यता, रघुवंशी प्रकाशन शुक्रवार पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती २००५
- संपादक मंडळ:- डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे 'बहिष्कृत भारत आणि मुकनायक', शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन-२००२
- डॉ. आम्बेडर बी.आर. : शुद्रों की खोज? प्रोग्रेसिव पब्लिशर धनवटे चेम्बर्स, सिताबर्डी नागपूर २००४
- Moon Vasant (Ed.) Dr. Babasaheb Ambedkar writing and speeches, Vol 1 to 20, Publisher Deptt. Of Education Govt. Of Maharashtra Mumbai.

प्रकाशीत दुय्यम साधने:-

- ऑमव्हेट गेल : वसाहतीक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन? पुणे, प्रथम आवृत्ती १९९५
- खरात यंशवंतराव: महाराष्ट्रातील महारांचा इतिहास, डॉ. शकुंतला खरात, विजय हाऊसिंग सोसायटी पुणे, प्रथम आवृत्ती २००३
- डॉ. गेडाम टी.जी. : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, प्रा, सौ, शारदा गेडाम, आवळे नगर, नागपूर प्रथम आवृत्ती २००६
- डॉ. साळुंखे आ.ह.: गुलामांचा आणि गलाम करणाऱ्यांचा धर्म एक नसतो, लोकायत प्रकाशन सातारा.

नियतकालिके व तृत्तपत्रे:-

जनता, समता, ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, बहिष्कृत भारत, मूकनायक, प्रबुध्द भारत, सम्राट इ.

★संशोधक विद्यार्थी★

लक्ष्मण गंगाधर शेळके

(एम.ए.एम.एड)

★संशोधक मार्गदर्शक★

प्रा. डॉ. एन.जी. भद्रे

(एम.ए.पीएच.डी.)
सहाय्यक प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक
पदव्यूत्तर इतिहास विभाग,
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर, जि.नांदेड.